# अमरावती महानगरपालिका अमरावती
## सहायक संचालक नगर रचना

राजकमल चौक, अमरावती -४४४६०३

(दुरध्वनी क्र.०७२१-२५६१५६१)

Email :- commr.amtcorp@gmail.com


AMC अमरावती महानगरपालिका अमरावती

.......... येथे इमारत बांधण्याकरीता **मंजुरी मिळण्याचे संदर्भात खालील अटींवर मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

१) समोरील, मागील व दोन्ही बाजूनी प्रत्येकी अंमलबजावणी करीता सोडावयास लागणाऱ्या नियमाचे अंमलबजावणीकरीता म्हणुन रिकामी झालेली जागा ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

२) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरीता/ उपयोग अथवा राहण्याकरीता परवानगी घेतलेली / उपयोगी होण्याकरीता नसेल.

३) आरंभ प्रमाणपत्र/ इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरीता वैध राहील.

४) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसित करण्यासाठी परवानगी अधिकार देणार नाही.

५) नकाशा मंजूर केल्याप्रमाणे/लाल रंगाने त्यात दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास/ भुखंडास लागून असणाऱ्या विद्यमान इमारतीस एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीस अनुसरून प्रस्तावित घराचे / इमारतीचे बांधकाम असावयास पाहिजे.

६) न्हाणी व संडास, स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी, घाण पाणी व कचरा यांची तांत्रिकदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावावी. **कोणताही वाद उद्भवल्यास सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.**

७) अर्जदारास मंजुर नकाशा व्यतिरिक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास महानगरपालिकेची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

८) मंजुर करण्यात आलेल्या विकास कामाची / बांधकामाची सोबत पत्रकावरील माहिती सदहु भुखंडावर योग्य जागी सुचना फलक लाऊन त्यात लिहिण्यात यावी. त्याचप्रमाणे जाहिरातीच्या स्वरुपातही माहिती दोन वर्तमान पत्रकात (एक मराठी) प्रसिध्द करण्यात यावी.

९) भुखंडात कमीतकमी दोन झाडे लावावीत.

१०) सेप्टीक संडास व्हँटीलेशन पाईपची उंची स्वतःच्या व शेजारी घराच्या उंचीपेक्षा १० फुट उंच ठेवावी. व्हँटीलेशन पाईपच्या तोंडावर डास प्रतिबंधक जाळी लावावी. सेप्टीक टँकद्वारे मैला, इतर सांडपाणी स्वतःच्या खर्चाने पक्की नाही बांधून महानगरपालिकेच्या पक्कया नालीत मिळवावी.

११) सदहु परवानगी तुर्त जोत्यापर्यत धरण्यात यावी तथापी एकत्रिकरण मंजुर विकास व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद २.८.४ प्रमाणे विकासकाने Appedix F मध्ये प्राधिकरणास कळविल्यानंतर जोत्यानंतर बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील.

१२) विना परवानगी बांधकाम साहित्य, मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकू नये, तसे आढळल्यास आपणावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१३) वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी मिळकतधारकाची राहील.

१४) भविष्यात म.न.पा.ला नाली करता जागा लागल्यास ती समास अंतरातून विनामुल्य द्यावी लागेल.

१५) मंजुर अभिन्यास / रेकॉर्ड प्रमाणे जागेची आखणी करुन घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची आहे. जागेबाबत तसेच बांधकामाबाबत काही वाद उद्भवल्यास अर्जदाराची सर्वस्वी जबाबदारी राहील. म.न.पा.ची काहीही जबाबदारी राहाणार नाही.

१६) कंपाऊंड वॉलचे बांधकाम करताना विभागणी नकाशावर दाखविलेल्या दुरुस्तीप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक राहील.

१७) ना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वत: दोन महिन्याचे आत पाडून टाकावे अन्यथा म.न.पा. कोणतीही नोटिस न देता पाडून टाकेलच. होणाऱ्या नुकसानीस अर्जदार स्वत: जबाबदार राहील व पाडण्याचा खर्च म.न.पा. वसूल करेल.

१८) पिण्याचे पाण्याची उपलब्धता वाढविणेबाबतचे स्त्रोत बळकटी करण्याकरीता दिलेल्या योजनेप्रमाणे व्यवस्था करावी आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.

१९) विद्यमान रस्त्याची रुंदी ४, ५ मी. पेक्षा कमी असल्यास रस्त्याचे मध्यापासून दोन्ही बाजुला २.२५ मी. अंतरापर्यंतची जागा ही रस्ता म्हणुनच सोडावी लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही.

२०) सौर उर्जेवर पाणी तापविण्याचा पध्दतीचा वापर करावा.

२१) घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मीती व सुक्या कचऱ्याचे पुर्नवर्गीकरण (3R) करणे बंधनकारक राहील.

२२) किटकजन्य रोगांना आळा घालण्याच्या दृष्टीने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत आपल्या अधिनिस्त होणाऱ्या बांधकामामध्ये तळघर, तळमजला, कॉलमचे खड्डे, बांधण्यात आलेल्या संडासची टाके इत्यादी मध्ये पाणी साचुन राहणार नाही, तसेच साचलेले पाण्याचा निचरा त्वरीत करण्याबाबत आपल्या स्तरावर योग्य कार्यवाही करण्यात यावी.

## सूचना

१) संदर्भाधीन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणास प्रमाणपप प्राप्त झालेल्या दिनाकांपासुन एक वर्षापर्यत वैध असतांना मुदत दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक वर्षाचे नूतनीकरण करण्याकरीता विहित नमुन्यात महानगरपालिकेत अर्ज करुन आवश्यक आहे.

२) महानगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पुर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल हे अवैध व अनधिकृत असतील त्यामुळे .. . ..

अ) आपणावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

ब) आपणास महानगरपालिकातर्फे इमारत वापरण्याकरीता ऑक्युपेशन सर्टिफिकेट आवश्यक असलेल प्रमाणपत्र मिळणार नाही त्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून विजपुरवठा आणि महानगरपालिका किंवा महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाकडून पाणी पुरवठा यापासुन वंचित राहील.

तरी कृपया मंजूर इमारत नकाशाप्रमाणे आपण बांधकाम करुन महानगरपालिकेला सहकार्य करावे.

सहायक संचालक नगर रचना
महानगरपालिका अमरावती